S.O. file

दलित वस्ती सुधारणा योजना
अनुदानाच्या रकमेत वाढ करणेबाबत

# महाराष्ट्र शासन

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

शासन निर्णय,क्रमांकः-दवसु-२०११/प्र.क्र. ४४२/अजाक
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ५ डिसेंबर, २०११

समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद रत्नागिरी
दाखल दिनांक - 0 2 मे 2012
विभाग स. क. स.

वाचा:- १) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
क्रमांक:-दवसु-२००८/प्र.क्र.५२४/विघयो-१,दिनांक १४/११/२००८
२) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
क्रमांक:-दवसु-२००८/प्र.क्र.५२४/विघयो-१,दिनांक १९/१२/२००८

प्रस्तावना:- दलित वस्ती सुधार योजनेचा एक भाग म्हणून ग्रामीण व शहरी भागामधील दलित वस्त्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी प्रत्येक दलित वस्तीला सन १९९९ पासून रु.५,००,०००/- (रुपये पाच लाख फक्त) इतके अनुदान मंजूर करण्यात येत होते. शासन निर्णय, दिनांक १४.११.२००८ अन्वये दलित वस्तीच्या लोकसंख्येच्या निकषानुसार लोकसंख्येच्या प्रमाणात अनुदानाच्या रकमेत वाढ करण्यात आली होती. या योजनेंतर्गत घेण्यात येणारे बांधकाम उदा. जोडरस्ते, गटारे बांधकाम, पाणी पुरवठा,दलित वस्ती अंतर्गत रस्ते, दलित वस्तींना पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरींची दुरुस्ती, वीज पुरवठा व समाज मंदिर बांधकामांच्या खर्चाची किंमत दिवसेंदिवस वाढत असल्याने तसेच योजनेची उपयोगिता लक्षात घेता, या योजनेंतर्गत दिल्या जाणाऱ्या अनुदानामध्ये वाढ तसेच अन्य सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:- दलित वस्ती सुधारणा योजनेच्या सर्व बाबींचा विचार करुन दलित वस्ती सुधारण्यासाठी लोकसंख्येच्या निकषानुसार जास्तीत जास्त रु. २०,००,०००/- (रुपये वीस लाख फक्त) अनुदान देण्याबाबत सोबतच्या परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यास अनुसरुन प्रत्येक दलित वस्तीला लोकसंख्येच्या प्रमाणात पुढीलप्रमाणे अनुदानाच्या रकमेत वाढ करण्यास शासन मंजूरी देत आहे:-

| अ.क्र. | लोकसंख्या | अनुदान रक्कम (रुपये लाखात) |
|---|---|---|
| १ | १० ते २५ | २.०० लाख |
| २ | २६ ते ५० | ५.०० लाख |
| ३ | ५१ ते १०० | ८.०० लाख |
| ४ | १०१ ते १५० | १२.०० लाख |
| ५ | १५१ ते ३०० | १५.०० लाख |
| ६ | ३०१ च्या पुढे | २०.०० लाख |

२. ही योजना दिनांक १.१२.२०११ पासून अंमलात येईल.



३) आव... ४/६/१२ नोंदणी ... कार्य...

३. दलित वस्ती सुधारणा योजनेतर्गत करण्यात येणारे बांधकाम ग्रामपंचायत व पंचायत समितीच्या मदतीने करण्यात यावे. आयुक्त, समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. दलित वस्ती सुधारणा योजनेसाठी होणारा खर्च पुढील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व हा खर्च प्रतिवर्षी करण्यात येणाऱ्या तरतूदीमधून भागविण्यात यावा:-

२२२५- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण,

०१- अनुसूचित जातीचे कल्याण,

८००- इतर खर्च, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना

(०६)(०२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम १८७ अन्वये जिल्हा परिषदांना अनुदाने-दलित वस्त्यांची सुधारणा

(२२२५ ३०५ ५)

३१- सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)

५. सदर शासन निर्णय हा ग्रामीण दलित वस्त्यांसाठी असून नागरी दलित वस्त्यांसाठी नगर विकास विभागामार्फत स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सुनंदा मो. घड्याळे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति:-

आयुक्त, समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विभागीय आयुक्त
महालेखापाल ,(लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षण) महाराष्ट्र-१/२ ,मुंबई/नागपूर
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
सहसचिव, मा. मुख्यमंत्री यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई
सह आयुक्त, समाजकल्याण (अनुसुचित जाती उपयोजना),महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
वित्त विभाग/ नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण
सर्व सहाय्यक आयुक्त,समाजकल्याण
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
मा. मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक,मंत्रालय, मुंबई
ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
उपसचिव/ कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय, मुंबई
निवडनस्ती (अजाक)

प्रधान सचिव,नगर विकास विभाग यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त अनुदानाच्या रकमेतील वाढ लक्षात घेऊन नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करावा.

## परिशिष्ट 'अ'

शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
क्रमांक:-दवसु-२०११/प्र.क्र.४४२/अजाक, दिनांक ५/१२/२०११

### दलित वस्ती सुधारणा योजनेंतर्गत अनुदानाच्या रकमेत वाढ करणेबाबत

| अ.क्र. | मुद्दा | बदल |
|---|---|---|
| १ | योजनेच्या नावात बदल | योजनेचे नांव "दलित वस्ती सुधार योजना" ऐवजी "अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे." असे असावे. |
| २ | दलित वस्तीची लोकसंख्या | दलित वस्ती घोषित करण्याचे निकष अधिक स्पष्ट असावेत. लोकसंख्येमध्ये दरवर्षी बदल होणार हे लक्षात घेता अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीतील लोकसंख्येची मोजणी करताना जनगणनेच्या निकषाबरोबर या वस्तीमध्ये असलेली प्रत्यक्ष लोकसंख्या लक्षात घेऊन, त्याप्रमाणे ग्राम सभेने ठराव पारित करावा व तो ग्राम पंचायतीकडे पाठविण्याची कार्यवाही करावी. त्यानंतर अशा अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीची तपासणी करुन,आवश्यक दुरुस्तीनंतर पंचायत समितीचा संकलित प्रस्ताव जिल्हा समितीकडे पाठविण्याचे अधिकार गट विकास अधिका-यांना असावेत. |
| ३ | योजनेअंतर्गत घ्यावयाची कामे | पाणी पुरवठयाची कामे,मलनिस्सारण, वीज, गटर बांधणे, अंतर्गत रस्ते, पोचरस्ते, पर्जन्य पाण्याचा निचरा (Rain Water Harvesting), इ. कामे प्राधान्याने घ्यावीत व गावातील सर्व वस्त्यांमधील मुलभूत सुविधांची कामे झाल्यानंतर समाजमंदिराचे बांधकाम करावे. जातीय ऐक्यता दृष्टीने संपूर्ण गावांसाठी एकच समाजमंदिर असावे व ते सर्व अनुसूचित जाती व नवबौध्द जातीच्या सर्व वस्त्यांना लाभ घेता येईल अशा मोक्याच्या ठिकाणी असावे. |
| ४ | पोहोच रस्ते | या योजनेअंतर्गत घेण्यात येणारे पोहोच रस्ते गावातील मुख्य रस्त्यापासून जिथपर्यंत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्या आहेत तिथपर्यंत घेण्यात यावेत. |
| ५ | समाजमंदिराबाबत | अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तींचा विकास करणे या योजनेअंतर्गत घ्यावयाच्या समाज मंदिराच्या बांधकामासाठी Type Plan निश्चित करुन त्याची बांधकाम मर्यादा रु.७.०० लाख करावी. समाज मंदिराचे बांधकाम झाल्यानंतर ते सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी ग्राम पंचायतीवर राहील. समाजमंदिराची दैनंदिन देखभाल व स्वच्छता रहावी यासाठी हे समाजमंदिर खाजगी कार्यक्रमासाठी नाममात्र भाडयाने देता येईल. हे भाडे किती असावे याबाबत ग्रामपंचायतीने निर्णय घेऊन ते वसुल करावे. त्यांचे स्वतंत्र खाते ठेवुन, त्यातुन दैनंदिन देखभाल व स्वच्छतेचा खर्च भागविण्यात यावा. परंतु ५ वर्षानी रु. १.०० लाख पर्यंत दुरुस्ती करता येईल.हा दुरुस्ती खर्च अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तींचा विकास करणे या योजनेसाठी दिलेल्या निधीतून भागविण्यात यावा. |

| अ.क्र. | मुद्दा | बदल |
|---|---|---|
| ६ | सामाजिक न्याय विभागाच्या नामफलकाबाबत | अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तींचा विकास करणे या योजनेअंतर्गत घेण्यात आलेल्या कामांचा सविस्तर तपशील व झालेला खर्च याची माहिती देण्यासाठी कोनशिला /नामफलक बसविण्यात यावा. |
| ७ | कामाच्या निवडीचे अधिकार | या योजनेंतर्गत करावयाच्या कामांचा ग्रामपंचायतीकडून प्राप्त झालेला प्राधान्यक्रम व निकड लक्षात घेऊन कामांची निवड करण्याचे पुर्ण अधिकार मुख्य/अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीला असावेत.त्यामध्ये कार्यकारी अभियता,जिल्हा परिषद , मुख्य लेखा व वित्त अधिकारी व संबधित पंचायत समितीचे गट विकास अधिकारी सदस्य राहतील, जिल्हा परिषदेचे समाज कल्याण अधिकारी हे सदस्य सचिव राहतील. |
| ८ | प्रशासकीय मंजूरी | कामांना प्रशासकीय मंजुरी देण्याचे अधिकार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या अधिनियमानुसार असतील. |
| ९ | दलित वस्तीच्या कामाचे नियंत्रण | कामावर प्राथमिक नियंत्रण पंचायत समितीचे गट विकास अधिकारी ,संबधित उप अभियंता व जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता यांचेकडे राहील. कामाची निवड प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही व निधी वितरण प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सप्टेंबर महिना अखेर पुर्ण व्हावी व शक्यतो कामे त्याच आर्थिक वर्षात पूर्ण व्हावीत. कोणत्याही परिस्थितीत कामे मंजुर केल्यापासून एक वर्षाच्या आंत संबंधित ग्रामसेवकाच्या साहाय्याने ग्रामपंचायतीमार्फत पुर्ण करण्याची जबाबदारी त्या त्या तालुक्याच्या गट विकास अधिकाऱ्याची राहील. गावातील काम अपूर्ण राहिल्यास, त्या ग्राम पंचायतीला पुढील २ वर्षाकरिता निधी देण्यात येऊ नये. |
| १० | दलित वस्ती निधी वाटप करतानाचा प्राधान्यक्रम | या योजने अंतर्गत कामे घेताना खालीलप्रमाणे प्राधान्यक्रम द्यावा:-<br>- गावांतील ज्या वस्त्यांना अद्यापी काहीच लाभ दिला नाही अशा वस्त्या.<br>- जादा अनुदानाचा लाभ देणे बाकी आहे अशा वस्त्या<br>- एकदा लाभ दिलेल्या वस्त्या व<br>- दोनदा लाभ दिलेल्या वस्त्या<br>बऱ्याच वेळा लोकप्रतिनिधी एकाच गावांला किंवा वस्तीला सलग वर्षात लाभ मिळावा यासाठी आग्रही असतात. त्यामुळे प्राधान्य क्रमाने गावांना/वस्त्यांना लाभ देता येत नाही. याकरिता वरील प्रमाणे प्राधान्य क्रमानेच कामे करावीत. |
| | | प्राधान्य क्रम देणेसाठी गट विकास अधिकारी यांनी त्यांच्या तालुक्यातील सर्व गावांची प्राधान्य क्रमाने यादी तयार करुन जिल्हा कार्यालयास सादर करावी व त्यानुसारच परिपुर्ण प्रस्ताव कार्यालयास सादर करावेत. |



सुनीलसाठे

| अ.क्र. | मुद्दा | बदल |
|---|---|---|
| | | या योजनेअंतर्गत घेण्यात येणा-या कामांसाठी निधीचे वाटप करताना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या साहाय्याने तालुकानिहाय अनुसुचीत जाती /नवबौध्द घटकांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात करावे. |
| ११ | दलित वस्ती निधी वितरित करावयाची कार्यपद्धती | ज्या कामांना मंजुरी दिली आहे त्या कामांचा ९० टक्के निधी गट विकास अधिका-यांना वितरित करावा. ग्रामपंचायतीला उपलब्ध करुन दिलेली रक्कम ग्राम सेवक व गट विकास अधिकारी यांच्या संयुक्त खात्यामध्ये ठेवावी. काम सुरु करण्यापूर्वी २५% रक्कम प्रथम अदा करावी व तद्नंतर प्रत्यक्षात पुर्ण झालेल्या कामाचे मूल्यांकन करुन त्या त्या प्रमाणात रक्कम अदा करावी. उदा. २५%,५०% व ७५%. ९०% रक्कम अदा केल्यानंतर जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांनी कामाची पाहणी करुन १००% काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र दिल्यानंतर उर्वरित १०% रक्कम ग्रामपंचायतीस अदा करावी. |
| १२ | कामे देण्याबाबतच्या सूचना | दलित वस्तीतील कामे करण्यासाठी ग्रामपंचायतीकडून अनुसुचीत जाती /नवबौध्द घटकांतील सुशिक्षित बेरोजगार अभियंते तसेच अनुसुचीत जाती /नवबौध्द घटकांचे लोक सदस्य असलेल्या मजूर सोसायटयांची निवड करण्यात यावी. |

सुनिधीकार्य

*****

**अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे (पूर्वीचे नाव दलितवस्ती सुधार योजना) या योजनेसाठीच्या कामांबाबत...**

## महाराष्ट्र शासन
## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
### शासन निर्णय क्रमांकः दवसु-२०१५/प्र.क्र.५९/अजाक-१,

मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२

तारीख: २७ मे,२०१५

**वाचा**

१) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
क्रमांक :-दवसु-२०११/ प्र.क्र.४४२/अजाक,दिनांक ०५.१२.२०११

२) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
क्रमांक :-दवसु-२०११/प्र.क्र.४४२/अजाक-१,दिनांक ३१.१२.२०११

३) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
क्रमांक :-दवसु-२०११/प्र.क्र.४४२/अजाक-१,दिनांक ०२.०७.२०१२

४) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
क्रमांक :-दवसु-२०११/प्र.क्र.४४२/अजाक-१,दिनांक २०.१२.२०१२

५) मा.उच्च न्यायालय,खंडपीठ नागपूर यांचे दिनांक रिट पिटीशन क्र.१६९८/२०११ संदर्भातील दि.१३.०४.२०१२ चे आदेश.

६) नियोजन विभागाचे शासन निर्णय क्र.
(१) जिवायो १००७/प्र.क्र.३९/का.३४४४,दि.१६.०२.२००८ व
(२) डिएपी-१०१४/प्र.क्र.२९५/का.१४८१/,दि.१७.१२.२०१४.

**प्रस्तावना**

अनुसूचित जातीच्या समाजाचे लोक समुहाने गावाच्या परिसिमेत वास्तव्य करीत राहतात. तसेच ब-याचदा अनुसूचित जातींपैकी उपजाती व जातीनिहाय घरे वेगवेगळया समुहाने एकत्रित वास्तव्य करुन राहतात व अशाप्रकारे वास्तव्य करुन असलेल्या सर्व जाती/उपजातींच्या समुहास दलित वस्ती असे संबोधण्यात येते. या वस्त्यांमध्ये मुलभूत सोयीसुविधा पुरवून तेथील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी दलित वस्ती सुधार योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत दलित वस्त्यांमध्ये अंतर्गत रस्ते, नाली बांधणे, पाणीपुरवठा, पाण्याचा हौद, समाजमंदिर, रस्त्यावरील विद्युत पुरवठा, शौचालये इ.गरजा विचारात घेऊन विकास कामांना प्रशासकीय मंजूरी दिली जाते.

२. दलित वस्ती सुधार योजनांतर्गत मंजूर करावयाच्या कामांना मंजूरी देण्यासंदर्भातील या विभागाच्या दि.५.१२.२०११ च्या शासन निर्णयातील परिशिष्ट अ मधील क्र.(७) अन्वये अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. त्यानुसार अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे या संदर्भातील कामांची निवड करण्याबाबतची कार्यवाही सदरील समितीकडून करण्यात येते.

३. या अनुषंगाने नियोजन विभागाने दि.१६.०२.२००८ च्या शासन निर्णयान्वये सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना निधी अर्थसंकल्पीत करणे,वितरीत करणे व या निधीतील कामांना प्रशासकीय मान्यता देणेबाबतची सुधारीत कार्यपध्दतीबाबत निदेश दिले आहेत. तसेच दिनांक १७.१२.२०१४ च्या शासन निर्णयान्वये उपरोक्त दि.१६.०२.२००८ च्या शासन निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत निदेश दिले आहेत. त्यातील निदेशास अनुसरुन तसेच मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ-नागपूर यांनी रिट पिटीशन क्र.१६९८/२०११ मध्ये दि.१३.०१.२०१२ अन्वये दिलेल्या निर्णयास अनुसरुन दलित वस्तीची कामे देखील जिल्हा परिषदेच्या मान्यतेने करण्यात यावीत याबाबत शासन स्तरावर विचाराधिन होते.

## शासन निर्णय

नियोजन विभागाने दि.१६.०२.२००८ च्या शासन निर्णयान्वये सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना निधी अर्थसंकल्पीत करणे,वितरीत करणे व या निधीतील कामांना प्रशासकीय मान्यता देणेबाबतची सुधारीत कार्यपध्दतीबाबत निदेश व दिनांक १७.१२.२०१४ च्या शासन निर्णयातील सदरील शासन निर्णयाच्या अंमलबजावणीबाबतचे निदेश दिले आहेत. त्यास अनुसरुन तसेच मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ-नागपूर यांनी रिट पिटीशन क्र.१६९८/२०११ मध्ये दि.१३.०१.२०१२ अन्वये दिलेल्या निर्णयास अनुसरुन या विभागाच्या दि.५.१२.२०११ मधील परिशीष्ट अ मधील क्र.(७) अन्वये अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेली समिती रद्द करण्यात येत असून दलित वस्तीची कामे देखील जिल्हा परिषदेमार्फत मंजूर करण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०५२८१११५१४८३२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Narendra Murlidhar Patil

Digitally signed by Narendra Murlidhar Patil
DN: CN = Narendra Murlidhar Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Section Officer
Date: 2015.05.28 11:16:06 +05'30'

(न.मु.पाटील)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त,समाजकल्याण,महाराष्ट्र राज्य,पुणे
२) महालेखापाल,(लेखा व अनुज्ञेय/लेखा परिक्षा) महाराष्ट्र १/२,मुंबई/नागपूर
३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद
४) सहसचिव,मा.मुख्यमंत्री यांचे कार्यालय,मंत्रालय,मुंबई

३९

ल्हा परिषद रत्नागिरी
मान्य प्रशासन विभाग

| |
|---|
| / अतारांकित प्रश्न |
| / मा... |
| / मंत्री |
| / लोकायुक्त |
| अधिकारी / सदस्य |
| .../हक्कभंग अधिकार |

**अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे (पूर्वीचे नाव दलितवस्ती सुधार योजना) या योजनेसाठीच्या कामाबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांकः दवसु-२०१५/प्र.क्र.५९ /अजाक-१**
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
तारीख: ८ मार्च, २०१६

**वाचा**

१) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक:- दवसु-२०१५/प्र.क्र.५९/ अजाक-१, दिनांक २७.५.२०१५

**शुध्दीपत्रक**

समक्रमांकीत शासन निर्णय दिनांक २७.०५.२०१५ अन्वये "दलित वस्तीची कामे देखील जिल्हा परिषदेमार्फत मंजूर करण्याबाबतचे" आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदरील आदेशात दुरूस्ती करुन "सदरची कामे जिल्हा परिषद समाजकल्याण समितीच्या मान्यतेने मंजूर करावीत" असे वाचावे.

२. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१६०३०८१७२२३९३६२२ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ashok Shankar Kamble

Digitally signed by Ashok Shankar Kamble
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a46cabe5c0508ff162796cef6812e5a0871884a74589e042544f55b57006300, cn=Ashok Shankar Kamble
Date: 2016.03.09 15:40:00 +05'30'

**(अ.शं.कांबळे)**
कार्यासन अधिकारी

**प्रत,**

१. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२. सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
३. आयुक्त समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
४. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेय/लेखा परिक्षा) महाराष्ट्र १/२ मुंबई/नागपूर

**प्रत माहितीसाठी,**

१. मा.मंत्री/मा.राज्यमंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव
२. सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
३. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग
४. सर्व सहायक आयुक्त, समाजकल्याण
५. उपसचिव/कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प/विघयो), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मंबई

002

**अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांचा विकास करणे योजनेंतर्गत अनुज्ञेय असलेल्या अनुदानाच्या रक्कमेत वाढ करणे तसेच, "संविधान सभागृहाचे बांधकाम करणे" या कामाचा समावेश करण्याबाबत.**

4493

समाज कल्याण विभाग
जिल्हा परिषद रत्नागिरी.
दिनांक - 071021
कार्यासन - 8 मा - 2
क.प्र.अ. - जि.स.क.

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०२१/प्र.क्र.७९/अजाक**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ३२.
तारीख: ०६ ऑक्टोबर, २०२१.

**वाचा :**

**१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांकः दवसू-२००८/प्र.क्र.५२४/विघयो-१, दिनांक १४ नोव्हेंबर, २००८**

**२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांकः दवसू-२००८/प्र.क्र.५२४/विघयो-१, दिनांक १९ डिसेंबर, २००८**

**३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांकः दवसू-२०११/प्र.क्र.४४२/अजाक, दिनांक ०५ डिसेंबर, २०११**

**प्रस्तावना :-**

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांचा विकास करणे या योजनेंतर्गत पाणी पुरवठयाची कामे, मलनिस्सारण, वीज, गटर बांधणे, अंतर्गत रस्ते, पोच रस्ते, पर्जन्य पाण्याचा निचरा (Rain Water Harvesting) इ. कामे प्राधान्यानी घ्यावीत व गावातील सर्व वस्त्यांमधील मुलभूत सुविधांची कामे झाल्यानंतर समाजमंदिराचे बांधकाम करावे तसेच, जातीय ऐक्याच्या दृष्टीने संपुर्ण गावासाठी एकच समाज मंदिर असावे व ते सर्व अनुसूचित जाती व नवबौद्ध जातीच्या सर्व वस्त्यांना लाभ घेता येईल अशा मोक्याच्या ठिकाणी असावे, अशी तरतूद करण्यात आली आहे.

सदर योजनेसाठी उपरोक्त संदर्भ क्रमांक ०३ च्या शासन निर्णयान्वये अनुदानाची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. त्यास आता बराच कालावधी उलटून गेलेला आहे. यासंदर्भात लोकसंख्येच्या प्रमाणात अनुदान, अनुदानाची कमाल मर्यादा व कालावधी विचारात घेता, सदर वस्त्यांमध्ये मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध होऊ शकत नाहीत. त्यामुळे सदर योजनेचा मूळ हेतू साध्य होत नाही. महागाई निर्देशांकात झालेली वाढ, साहित्याचे व मजुरीचे वाढलेले दर ही बाब विचारात घेता सदर योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या रकमेत वाढ करण्याची तसेच अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांचा विकास करणे या योजनेंतर्गत "संविधान सभागृहाचे बांधकाम करणे" या कामाचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

उपरोक्त परिस्थिती विचारात घेता अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांचा विकास करणे या योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या रकमेत खाली दिलेल्या तक्त्यानुसार पूर्वीच्या अनुदानात दुप्पट वाढ करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

| अक्र. | लोकसंख्या | अनुदान रुपये (रुपये लाखात) |
|---|---|---|
| १. | १० ते २५ | ४.०० |
| २. | २६ ते ५० | १०.०० |
| ३. | ५१ ते १०० | १६.०० |
| ४. | १०१ ते १५० | २४.०० |
| ५. | १५१ ते ३०० | ३०.०० |
| ६. | ३०० च्या पुढे | ४०.०० |

तसेच ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द समाज घटकांपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार पोहचविणे, शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी अभ्यासिका सुरु करणे, राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजनांची माहिती ग्रामीण भागापर्यंत पोहचविणे यासाठी राज्यात ग्रंथालय व अभ्यासिका यासारख्या अद्ययावत सुविधांसह "संविधान सभागृह" सुरु करण्यास शासनाची मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

पहिल्या टप्प्यात ज्या गावातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील लोकसंख्या ५०० किंवा त्यापेक्षा जास्त आहे अशा गावात अनुसूचित जाती नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांचा विकास करणे या योजनेंतर्गत संविधान सभागृहाचे बांधकाम करण्यास मान्यता देण्यात यावी. यासाठी सर्वप्रथम अशा संभाव्य प्रस्तावांची जिल्हानिहाय यादी शासनस्तरावर सादर करण्यात यावी. त्याआधारे सन २०२१-२२ मध्ये सुरु करावयाच्या संविधान सभागृहांची यादी शासनाकडून अंतिम करण्यात येईल. त्यानुसार जिल्हा विकास व नियोजन समिती प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही पूर्ण करेल.

संविधान सभागृह इमारतीच्या संकल्पनेत तळमजल्यावर एक सभागृह ज्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संपूर्ण जीवन चरित्राविषयीचे प्रेरणादायी भित्ती चित्रे असतील, इमारतीच्या पहिल्या मजल्यावर ग्रंथालय व अभ्यासिकासाठी दालन, ग्रंथालयामध्ये सर्व समावेशक विषयांवरील साहित्य, ग्रंथ, प्रबोधनात्मक साहित्य, प्रेरणादायी यशोगाथांचा संग्रहांचा समावेश राहील. ग्रंथालय व अभ्यासिका दालन डिजिटली सुसज्य राहील. तसेच, महिला व पुरुषांसाठी प्रसाधन गृह, समोर खुली जागा, संपूर्ण इमारतीला संरक्षक भिंत, सभागृहासमोर मुख्य दर्शनी भागात संविधान स्तंभ असावा. सदरहू इमारत बांधकामाची बाह्यरचना ही सध्याच्या सामाजिक न्याय भवन इमारतीच्या धर्तीवर असावी. सदरहू इमारत बांधकामाची संकल्पना ही पुर्णत: ग्रीन

बिल्डींग कन्सेप्टवर आधारीत राहील व त्यामध्ये सौर ऊर्जेचा वापर होईल (नेट मिटर संकल्पनेसह) याची दक्षता घ्यावी.

संविधान सभागृहाच्या देखभाल व विनियोगासाठी खालीलप्रमाणे ग्रामस्तरावरील समिती स्थापन करण्यात यावी :-

१. संबंधित ग्रामपंचायती मधील सरपंच, उपसरपंच व ग्रामसेवक हे पदसिद्ध सदस्य राहतील.

२. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील निवडून आलेले तीन ग्रामपंचायत सदस्य हे या समितीचे सदस्य राहतील. यामध्ये एक महिला सदस्य असणे अनिवार्य राहील.

३. संबंधित ग्रामपंचायतीने ग्रामसभेद्वारे गावातील तीन अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील व्यक्तींची सदस्य म्हणून निवड करावी. वरील दोनमध्ये नमूद निर्वाचित महिला सदस्य उपलब्ध न झाल्यास या तीन सदस्यांपैकी एक महिला उमेदवाराची निवड करण्यात यावी. ग्रामसभेतून निवड केलेल्यांपैकी एकाची समिती अध्यक्ष म्हणून निवड करावी.

४. वर नमूद तीन मधील सदस्यांची निवड करतांना तो/ती किमान पदवीधर असावा, सामाजिक कार्याची आवड असणे आवश्यक, त्याचबरोबर तो/ती निर्व्यसनी, गुन्हेगारी पार्श्वभूमी नसलेला व स्वच्छ चारित्र्याचा असणे अनिवार्य राहील.

५. या समितीचा कार्यकाळ हा ग्रामपंचायतीच्या कार्यकाळाएवढा राहील. सदरहू समितीचे कर्तव्य व जबाबदारी तसेच इमारत बांधकामाच्या विनियोगाबाबत व देखभालीबाबत सविस्तर सूचना आयुक्त समाज कल्याण, पुणे यांनी विहीत कराव्यात.

६. सदरहू इमारत बांधकामाचा कोणताही धार्मिक सण, उत्सव, राजकीय पक्षांच्या बैठका इ. करीता उपयोग करण्यास मज्जाव राहील.

संविधान सभागृह इमारतीच्या बांधकाम करिता संबंधित ग्रामपंचायतीने पुरेशा प्रमाणात जागा उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील. सदरची जागा ही अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या सर्व वस्त्यांसाठी सोयीस्कर असे मध्यवर्ती ठिकाणी असावी.

इमारतीचा देखभाल व दुरुस्तीसाठीचा खर्च ग्रामपंचायतीच्या २०% निधीतून करण्यासाठी योग्य ते निर्देश ग्रामविकास विभागामार्फत देण्याबाबत त्या विभागास विनंती करण्यात येत आहे.

संविधान सभागृहाचा आराखडा अंतिम केल्यानंतर सदर प्रकल्पासाठी लागणारा खर्च रु. ४० लक्ष च्या मर्यादेत होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

सदर कामे मंजूर अंदाजपत्रकीय किंमतीच्या मर्यादेतच पूर्ण होतील याची दक्षता घेण्यात यावी. मंजूर अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा जास्त खर्चाच्या कामांना प्रशासकिय मान्यता दिल्यास त्यासाठी कुठल्याही स्वरुपात अतिरिक्त निधी उपलब्ध करुन दिला जाणार नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२११००६१४५१२६४०२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA NATHA SAVANE

Digitally signed by RAJENDRA NATHA SAVANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SOCIAL JUSTICE AND SPECIAL ASSISTANCE DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0a2ac5ab6ca0075cc776c90ec03925f2eb8727640eacf311beb6f68d63939303, pseudonym=AE89A440549540E82C5C3FE007D468E20DCA5112, serialNumber=F049989DBBEF93340E9EDD88AF960A0963746D42BAA5C948405B62E821529A99, cn=RAJENDRA NATHA SAVANE
Date: 2021.10.06 14:53:10 +05'30'

(रा.ना. सवने)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. विरोधी पक्षनेता विधान सभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
२. सर्व सन्माननीय सदस्य, विधान सभा/ विधान परिषद,
३. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई, महाराष्ट्र राज्य,
४. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव,
५. मा. उप मुख्यमंत्री, तथा मंत्री (वित्त व नियोजन) महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव,
६. मा. मंत्री (सामाजिक न्याय विभाग) यांचे खाजगी सचिव,
७. मा. राज्यमंत्री (सामाजिक न्याय विभाग) यांचे खाजगी सचिव,
८. मा. राज्यमंत्री (वि.स.) यांचे खाजगी सचिव,
९. मा. मंत्री सर्व यांचे खाजगी सचिव,
१०. मा. राज्यमंत्री सर्व यांचे खाजगी सचिव,
११. मा. अमुस/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, महाराष्ट्र राज्य,
१३. मा. प्रधान सचिव (सा.न्या.) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१४. विभागीय आयुक्त सर्व महसूल विभाग, महाराष्ट्र राज्य,
१५. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई,
१६. आयुक्त, सर्व महानगरपालिका, महाराष्ट्र राज्य,
१७. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे,
१८. सर्व जिल्हाधिकारी,
१९. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद, महाराष्ट्र राज्य,
२०. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद/ नगरपालिका, महाराष्ट्र राज्य,
२१. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण,
२२. सर्व सहायक आयुक्त, समाज कल्याण,
२३. निवडनस्ती (अजाक).